**जिल्हा परिषद विशेष सभा दिनांक ७ नोव्हेंबर २०१४**

**कार्यवृत्त भाग -१**

आज दिनांक ७ नोव्हेंबर २०१४ रोजी जिल्हा परिषदेची विशेष सभा डॉ. पंजाबराव देशमुख सभागृह जि.प. अमरावती येथे दुपारी १.०० वाजता आयोजित करण्यात आली. मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद, अमरावती यांनी आजच्या सभेला उपस्थित सन्मा. पदाधिकारी, सर्व सन्मा जिल्हा परिषद सदस्य तथा सर्व सभापती पंचायत समिती व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे सभेस उपस्थितीबाबत स्वागत केले व आजची सभा सुरु करण्यास सचिव तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) यांना अनुमती दिली.

**सचिवः** आजच्या सभेस उपस्थित मा. अध्यक्ष श्री.सतिश चिंधुजी उईके, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती, सन्मा.जिल्हा परिषद विषय समिती सभापती तसेच उपस्थित सर्व सन्मा. सदस्य यांचे मी स्वागत करतो व मा. अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने सभेस सुरुवात करतो. आजच्या सभेचा विषय क्रमांक १:- महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम ८३ पोटकलम (२) व (५) नुसार (१) शिक्षण समिती (२) वित्त समिती (३) आरोग्य समिती (४) बांधकाम समिती या चार समित्यामधुन दोन विषय समित्यांचा एक गट याप्रमाणे दोन गट पाडणे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम ८३ पोटकलम (२) (५) चे तरतुदीकरिता (१) शिक्षण समिती (२) वित्त समिती (३) आरोग्य समिती (४) बांधकाम समिती या चार समित्यांमधून दोन विषय समित्यांचा एक गट याप्रमाणे दोन गट पाडावे लागतील.

कलम ७९ नुसार स्थायी समिती हा एक गट असल्यामुळे जिल्हा परिषदेला वेगळा गट करण्याची आवश्यकता नाही.

कलम ७९ (अ) नुसार जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती हा सुध्दा एक गट असल्यामुळे वेगळा गट करण्याची आवश्यकता नाही.

कलम ८३( ३) नुसार कृषि समिती व पशुसवंर्धन व दुग्ध विकास समिती हा सुध्दा गट असल्यामुळे जिल्हा परिषदेला वेगळा गट करण्याची आवश्यकता नाही.

कलम ८३(३) नुसार समाज कल्याण समिती हा सुध्दा एक गट असल्यामुळे ही समिती सुध्दा वेगळया गटात समाविष्ट करण्याची आवश्यकता नाही.

कलम ८३(२) नुसार महिला व बाल कल्याण समिती हा एक गट असल्यामुळे ही समिती सुध्दा वेगळया गटात समाविष्ठ करण्याची आवश्यकता नाही.

**मा.अध्यक्ष : -** सभेचा पहिला विषयानुसार खालील प्रमाणे गट पाडण्याबाबत आजचे सभेमध्ये मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

१) बांधकाम व शिक्षण

२) वित्त व आरोग्य

**सचिव :-** आजच्या सभेचा विषय क्रमांक २ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम ७९ व (७९ क) (१ ) (अ) नुसार मा.अध्यक्षांकडे व ८३ पोटकलम ( १) (२) (३) (५) नुसार मा.उपाध्यक्ष व २ मा. सभापतीकडे विषय समित्या सोपविणे.

**मा.अध्यक्ष :-** आजचे सभेच्या दुसऱ्या विषयानुसार सन्मा.उपाध्यक्ष तथा विषय समिती सभापतींकडे खालील प्रमाणे विषय समित्या सोपविण्यात येत आहे.

| अ.क्र. | मा.अध्यक्ष/मा. उपाध्यक्ष, मा.सभापती विषय समिती यांचे नांव व पदनाम | समितीचे नांव |
|---|---|---|
| १ | मा.श्री.सतिश चिंधुजी उईके,अध्यक्ष, जिल्हा परिषद,अमरावती तथा पदसिध्द सभापती | स्थायी समिती / जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती |
| २ | मा. श्री. सतिश विनायकराव हाडोळे,उपाध्यक्ष, जिल्हा परिषद,अमरावती | वित्त व आरोग्य |
| ३ | मा.सौ.सरीता विजयराव मकेश्वर,सभापती,समाज कल्याण समिती जिल्हा परिषद,अमरावती | समाज कल्याण समिती |
| ४ | मा.सौ.वृषाली प्रकाशराव विघे,सभापती,महिला व बाल कल्याण समिती,जिल्हा परिषद अमरावती. | महिला व बाल कल्याण समिती |
| ५ | मा.श्री.गीरीष रंगरावजी कराळे, सभापती विषय समिती, जिल्हा परिषद,अमरावती | बांधकाम व शिक्षण |
| ६ | मा.सौ.अरुणा राजेंद्रजी गोरले,सभापती, विषय समिती, जिल्हा परिषद,अमरावती | कृषि व पशुसंवंर्धन व दुग्ध विकास समिती |

वरीलप्रमाणे सन्मा. उपाध्यक्ष तथा विषय समिती सभापतींना खाते वाटप करण्यात येत आहे तसेच आजची सभा संपल्याचे सचिव यांनी जाहीर करावे.

**सचिव :-** आजच्या सभेला उपस्थित सर्व सन्मा. पदाधिकारी, सन्मा. जि.प. सदस्य, सर्व अधिकारी यांचे उपस्थिती बाबत आभार मानतो व मा. अध्यक्ष महोदय यांचेवतीने आजची सभा संपल्याचे जाहीर करतो.

**सचिव तथा**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा),**
**जिल्हा परिषद, अमरावती**

**अध्यक्ष**
**जिल्हा परिषद, अमरावती**

**जिल्हा परिषद,अमरावती**

**जिल्हा परिषद विशेष (जि.प.विषय समिती सभापतींना खाते वाटप) सर्वसाधारण सभा दिनांक ७ नोव्हेंबर २०१४**
**कार्यवृत्त भाग-२ (मंजुर/नामंजुर विषयाची यादी)**

| **अ.क्र.** | **विभागाचे नांव** | **विषय क्रमांक** | **ठराव क्रमांक** | **विषय** | **मंजुर/नामंजुर** |
|---|---|---|---|---|---|
| **०१** | **साप्रवि** | **०१** | **०१** | महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम ८३ पोटकलम (२)(५) चे तरतुदीकरिता (१) शिक्षण समिती (२) वित्त समिती (३) आरोग्य समिती (४) बांधकाम समिती या चार समित्यांमधून दोन विषय समित्यांचा एक गट या प्रमाणे दोन गट पाडणे.<br><br>**ठराव :-** वरील प्रस्तावावर साधक बाधक चर्चा करण्यात येवुन, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम ८३ पोटकलम (२)(५) चे तरतुदी १) बांधकाम व शिक्षण समिती व २) वित्त व आरोग्य समिती या प्रमाणे दोन गट पाडण्यास सर्वानुमते मंजुरी प्रदान करण्यात आली.<br><br>**सुचक** :-मा.श्री.सतिश चिंधुजी उईके **अनुमोदक :-** मा. श्री.अनिरुध्द ऊर्फ बबलुभाऊ सु.देशमुख | **०७.११.२०१४**<br><br>मंजुर |
| | | **०२** | **०२** | महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम ७९ व (७९ क) (१ ) (अ) नुसार मा.अध्यक्षांकडे व ८३ पोटकलम ( १) (२) ( ३) (५) नुसार मा.उपाध्यक्ष व २ मा. सभापतीकडे विषय समित्या सोपविणे.<br><br>**ठराव :-** वरिल प्रस्तावित केल्याप्रमाणे मा.उपाध्यक्ष तथा विषय समिती सभापतीं कडे समित्या सोपविण्यास सर्वानुमते मंजुरात प्रदान करण्यात आली.<br><br>**सुचक :-** मा.श्री.सतिश चिंधुजी उईके **अनुमोदक :-** मा.श्री.मोहन ऊर्फ महेंद्र घे.सिंघवी | **०७.११.२०१४**<br><br>मंजुर |

यावप्रमाणे सभेमध्ये विषय सुचीवरील २ विषयावर सभेमध्ये साधक बाधक चर्चा होऊन २ विषयास मंजुरात प्रदान करण्यात येवून त्याअनुषंगाने २ ठराव सर्वानुमते पारीत करण्यात आले.

**सचिव तथा**
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य)**
**जिल्हा परिषद,अमरावती**

**अध्यक्ष**
**जिल्हा परिषद,अमरावती**

Patoceo/gbmeeting/